# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट २०२- २३ दिनांक : - २६/०६/२०२३

**७०० ग्रॅम वजनाचा गांजा व ४८ ग्रॅम वजनाचा गर्द (ब्राऊन शुगर) असा एकुण ०१,२९,०००/- रुपये किंमतीचा अंमली पदार्थ विक्री करीता बाळगणाऱ्या इसमांवर विरार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कारवाई.**

दिनांक २४.०६.२०२३ रोजी विरार पोलीस ठाणेतील गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार हे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना जकात नाका, विरार पश्चिम येथे रोडच्या बाजुला दोन इसम सफेद रंगाच्या पिशवी हातात घेवून संशयितरित्या उभा असल्याचे निदर्शनास आल्याने त्यांस विचारपुस करण्याकरीता ताब्यात घेण्याचा प्रयत्न करीत असताना त्यातील एका इसमाने सदरची पिशवी दुसऱ्या इसमाच्या अंगावर फेकुन पळुन जात होता. त्यावेळी स्टाफने त्याचा पाठलाग करून त्याला शिताफीने ताब्यात घेतले. तदनंतर विरार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी कायदेशीर बार्बीची पुर्तता करुन सदर इसमांपैकी एका इसमाच्या ताब्यात असलेली पिशवीची झडती घेतली असता त्यात ७०० ग्रॅम वजनाचा ९०००/- रुपये किंमतीचा गांजा हा अंमली पदार्थ व दुसऱ्या इसमाच्या अंगझडतीमध्ये ४८ ग्रॅम वजनाचा १,२०,०००/- रुपये किंमतीचा तपकिरी रंगाचा गर्द (ब्राऊन शुगर) नावाचा अंमली पदार्थ असल्याचे निदर्शनास आले सदर इसमांस त्यांचे नाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव १) मेहुल मोहन आमरे, वय ३६ वर्षे, रा. आगाशी, विरार पश्चिम, २) सुरेंद्र ओमप्रकाश चौधरी, वय २७ वर्षे, रानालासोपारा पुर्व असे सांगितले. सदर इसमांविरुध्द पो.हवा. विशाल लोहार यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन विरार पोलीस ठाणेत एन.डी.पी.एस. कायदा कलम ८ (क), २० (ब) II (अ), २१ (ब) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त,विरार विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री. राजेंद्र कांबळे, पो.नि. श्री. दिलीप राख (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकातील पो.उप.नि.संदेश राणे, पो.हवा. सचिन लोखंडे, संदीप जाधव, संदीप शेरमाळे, विशाल लोहार, इंद्रनिल पाटील, योगेश नागर पो.अंम. मोहसिन दिवान, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, प्रफुल सोनार यांनी केली आहे.

*********